# अर्थ मंत्रालय
# आर्थिक व्यवहार विभाग
# (भांडवली बाजार विभाग)

## राजीव गांधी इक्विटी सेव्हिंग स्कीमबाबत (आरजीईएसस) सातत्याने विचारण्यात येणारे प्रश्न

## अनुक्रमणिका

**आरजीईएसएसची उद्दिष्ट्ये आणि कायदेशीर बाबी**

- आरजीईएसएस म्हणजे काय?
- योजनेचे उद्दिष्ट काय?
- आरजीईएसएससाठीच्या कायदेशीर तरतुदी काय आहेत?
- प्रथमच गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार यांना इक्विटी मार्केटमध्ये नुकसान होत नाही का?
- गुंतवणूक करणे हे त्यांच्यासाठी खूप धोकादायक ठरू शकते का?
- आमच्याकडे याआधीच इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्कीम (ईएलएसएस) मग आरजीईएसएसची आम्हाला गरज काय?
- करबचतीच्या इतर योजनांच्या तुलनेत आरजीईएसएसचे फायदे /ठळक वैशिष्टये कोणती?

**योजनेचे कव्हरेज : आरजीईएसएस अंतर्गत मंजूर असणारे गुंतवणूकदार व गुंतवणूक**

- योजनेत सर्वांनाच सहभागी होता येते का नवीन गुंतवणूकदार कोणाला म्हणायचे ?
- मी अनिवासी भारतीय आहे, मी आरजीईएसएस साठी पात्र ठरतो का?
- म्युच्युअल फंड आणि / किंवा एक्स्चेंज ट्रेडेड फंडसचे युनिट्स माझ्याकडे आधीच आहेत मी आरजीईएसएस साठी पात्र ठरतो का?
- माझ्याकडे फिजिकल शेअर्स आहेत, मी आरजीईएसएस साठी पात्र ठरतो काय?
- योजनेअंतर्गत गुंतवणुकीचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत, आरजीईएसएस अंतर्गत 'पात्र सिक्युरिटीज' कोणत्या आहेत?
- अशा पात्र स्टॉक्सची माहिती मला कुठे मिळू शकते?
- पहिल्या 100 स्टॉक्स पर्यंतच आरजीईएसएस गुंतवणूक मर्यादित का आहे?
- मी जेव्हा गुंतवणूक केली होती तेव्हा संबंधित स्टॉकचा बीएसई 100 मध्ये समावेश होता. मात्र, नंतर एक्स्चेंजने संबंधित स्टॉक बीएसई 100 च्या यादीतून बाहेर काढला. मी जेव्हा करपरतावा भरेन तेव्हा आरजीईएसएस अंतर्गत माझी गुंतवणूक पात्र ठरेल काय?
- मी मार्च महिन्यात आयपीओसाठी अर्ज केला. मात्र, कंपनी पुढील आर्थिक वर्षात म्हणजे एप्रिलमध्ये लिस्टेड झाली. तर माझी गुंतवणूक पात्र ठरते का?
- सिक्युरिटीज मार्केटमध्ये मी जास्तीत जास्त किती रक्कम गुंतवू शकतो? ती टप्प्याटप्प्याने भरता येऊ शकते का?
- आरजीईएसएस अंतर्गत दोन आर्थिक वर्षांमध्ये मी माझ्या गुंतवणुकीची विभागणी करू शकतो का व वजावटीची मागणी करू शकतो काय?
- आरजीईएसएस अंतर्गत किती पर्यंत करपरतावा मिळवता येऊ शकतो?
- कलम 80 जी अंतर्गत मी याआधीच करपरताव्याचा दावा केला आहे, आरजीईएसएसचा देखील मी लाभ घेऊ शकतो काय?

**आरजीईएसएसची उद्दिष्ट्ये आणि कायदेशीर बाबी**

- मी 50,000 रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करून आरजीईएसएस अंतर्गत करपरताव्याचा दावा करू शकतो का?
- मी 'अ' कंपनीचे शेअर्स खरेदी केले आहेत. जी आरजीईएसएस अंतर्गत रु. 70,000 पर्यंतच्या सिक्युरिटीसाठी पात्र आहे. 50,000 पेक्षा जास्त गुंतवणूक मी (कर)मुक्त कशी करू शकतो?
- मी फॉर्म 'बी' कधी भरू शकतो, त्याला काही कालमर्यादा आहे का?
- फॉर्म 'बी' मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या पात्र सिक्युरिटीजमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या रकमेवर मी कर परताव्याची मागणी करू शकतो काय?

**योजनेत सहभागी होणे : प्रक्रिया आणि कार्यात्मक मुद्दे**

- आरजीईएसएससाठी पात्र गुंतवणूक मी कशी करू शकतो?
- पात्र सिक्युरिटीज राखून ठेवण्याची पद्धत काय असेल?

- माझे म्युच्युअल फंड/ईटीएफ युनिट डीमॅट करून घेण्याची गरज आहे काय?
- आरजीईएसएसचे लाभ प्राप्त करण्यासाठी गुंतवणूकदाराला खास डीमॅट खाते उघडावे लागते का आरजीईएसएससाठी असलेल्या डीमॅट खात्यामध्ये आरजीईएसएससाठी पात्र नसलेल्या इतर सिक्युरिटीज मी ठेऊ शकतो काय?
- ऑफ मार्केट ट्रेड किंवा डिमटेरियलायझेशनच्या माध्यमातून माझ्या डीमॅट खात्यात जमा झालेल्या क्रेडिटवर मी आरजीईएसएसचे लाभ मागू शकतो काय?
- डिपॉझिटरी पार्टिसिपंटसह (डीपी) आरजीईएसएसचे डीमॅट खाते कसे उघडले जाऊ शकते?
- ट्रेडिंग खाते कसे उघडावे?
- डीमॅट/ट्रेडिंग खाते उघडण्यासाठी मला कोणती कागदपत्रे आणणे आवश्यक आहे?
- पॅनची गरज नसलेल्या श्रेणीत माझा समावेश होतो (सिक्कीमचा रहिवासी) तर मी पॅनशिवाय आरजीईएसएस खाते उघडू शकतो काय?
- माझ्या ट्रेडिंग आणि डीमॅट खात्यासाठी मी इंटरनेट ॲक्सेस मागू शकतो काय?
- आरजीईएसएस अंतर्गत मी सध्याचे डिमॅट खाते नोंदवू शकतो काय?
- फॉर्म 'ए' फॉर्म 'बी' इत्यादी मला कुठे मिळू शकतील?
- आरजीईएसएससाठी मी एकापेक्षा जास्त डीमॅट खाते नियुक्त करू अथवा उघडू शकतो काय?
- आरजीईएसएससाठी कमी किंमतीचे डीमॅट खाते असते काय?
- सिक्युरिटीज मार्केटमध्ये व्यवहार करताना काय करावे आणि काय करू नये?
- सिक्युरिटीज मार्केटमधील माझ्या व्यवहारांसंदर्भातील तक्रारींची नोंद मी कशी करू शकतो?

### लॉक इन परिस्थितीची अंमलबजावणी आणि आरजीईएसएस अंतर्गत सिक्युरिटीजचे मूल्यांकन

- कर बचतीसाठी आरजीईएसएस अंतर्गत करण्यात आलेल्या प्राथमिक गुंतवणुकीचे मूल्यांकन करण्याचे निकष काय असतात?
- आरजीईएसएस अंतर्गत करण्यात आलेल्या गुंतवणुकीचा होल्डिंग कालावधी काय असतो?
- 'फिक्स्ड लॉक इन' कालावधी काय असतो?
- लॉक इन कालावधी कधी सुरू होतो? खरेदी करण्याच्या दिवसापासून की सिक्युरिटीज डीमॅट खात्यात क्रेडिट झाल्यानंतर?
- आरजीईएसएस अंतर्गत असणा-या सिक्युरिटीजच्या रिसिटचा शेवटचा दिवस हा फिक्स्ड लॉक इन कालावधी म्हणून धरण्यात आला तर त्याचा परिणाम म्हणून लॉक इन तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही का?
- फिक्स्ड लॉक इन कालावधीत आरजीईएसएससाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या सिक्युरिटीज विकू शकतो काय?
- फ्लेक्झिबल लॉक इन कालावधी काय असतो?
- फ्लेक्झिबल लॉक इन कालावधीत मी व्यवहार किंवा विक्री करू शकतो काय?
- फ्लेक्झिबल लॉक इन कालावधीत सिक्युरिटीजचे मूल्य कसे काय ठरवण्यात येते?
- गुंतवणूकदार मूल्य ठरविण्यासाठी जे सर्वसाधारण सूत्र वापरतात त्यापेक्षा आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजचे व्हॅल्यूएशन करण्यासाठी वेगळी पद्धत वापरण्यात येते काय?
- तीन वर्षांच्या लॉक इन कालावधीची अंमलबजावणी कशी काय करण्यात येते?
- फ्लेक्झिबल लॉक इन कालावधीत पात्र सिक्युरिटीजचे खरेदी विक्री व्यवहार मी केले नाहीत तर काय होईल?
- फ्लेक्झिबल लॉक इन कालावधीच्या अखेरीस माझ्या डीमॅट खात्याचे काय होईल?

### देखरेख आणि दंड

- योजनेतील तरतुदींचे अनुपालन करण्याच्या उद्दिष्टासाठी मला आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजचे मूल्यांकन करावे लागेल का?
- करवजावटीसाठी मी दावा कसा करू शकतो?
- नवीन किरकोळ गुंतवणूकदार (रिटेल इन्व्हेस्टर) असल्याचे प्रमाणपत्र आणि वार्षिक विवरणपत्र मला कोण देईल?
- आरजीईएसएसच्या नियमांचे मी उल्लंघन केल्यास मला काय दंड होऊ शकतो?
- फ्लेक्झिबल लॉक इन कालावधीच्या दरम्यान आरजीईएसएसपात्र गुंतवणुकींवर स्प्लिट, कन्सोलिडेशन, बोनस, राईटस इत्यादि प्रकारच्या कॉर्पोरेट ॲक्शनचा काय परिणाम होतो?
- योजनेवर देखरेख कशी ठेवण्यात येते?
- अधिक तपशिलासाठी मी कोणाशी संपर्क करू शकतो?

## आरजीईएसएसची उद्दिष्ट्ये आणि कायदेशीर बाबी

- **आरजीईएसएस म्हणजे काय?**
  राजीव गांधी इक्विटी सेव्हिंग स्कीम (आरजीईएसएस) ही करात सूट मिळविण्यासाठीची योजना असून 2012-13 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात (परिच्छेद 35) तिची घोषणा करण्यात आली आहे. ही योजना खास करून ज्यांचे वार्षिक एकत्रित उत्पन्न 12 लाख रुपये इतके किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सिक्युरिटीज मार्केटमधील नव्या व्यक्तिगत रिटेल गुंतवणूकदारांसाठी बनविण्यात आली आहे. व्यक्ती त्याच्या त्या वर्षीच्या करपात्र उत्पन्नावर जास्तीत जास्त 50 हजार रुपयांची गुंतवणूक करू शकतो त्यावर प्राप्तिकर (इन्कम टॅक्स) कायद्याच्या 80 सीसीजी कलमांतर्गत 50 टक्क्यांपर्यंत कर सवलत मिळू शकते.

- **योजनेची उद्दिष्ट्ये काय आहेत?**
  केंद्रीय अर्थसंकल्प 2012-13 मध्ये घोषित केल्यानुसार बचतीचे प्रमाण वाढवून देशांतर्गत भांडवली बाजाराची व्याप्ती वाढविणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. भारतात 'इक्विटी कल्चर' वाढण्यास त्यामुळे मदत होणार आहे. भारतीय सिक्युरिटीज मार्केटमध्ये रिटेल गुंतवणूकदारांची व्याप्ती वाढविणे व आर्थिक स्थिरता आणणे हे देखील या योजनेचे उद्दिष्ट आहे.

- **आरजीईएसएससाठीच्या कायदेशीर तरतुदी काय आहेत?**
  इक्विटी सेव्हिंग योजनेत गुंतवणूक केल्यामुळे कर सवलतीसाठी इन्कम टॅक्स कायदा 1961 मध्ये नवे 80 सीसीजी या कलमाचा अंतर्भाव करण्यात आला. फायनान्स कायदा 2012 नुसार ज्यांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न 10 लाख किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा नव्या रिटेल गुंतवणूकदारांना जे पात्र सिक्युरिटीजमध्ये 50 हजार रूपयांपर्यंत गुंतवणूक करतील अशांना कर सवलत देणे.
  23 नोव्हेंबर 2012 रोजी आरजीईएसएस योजनेची पूर्ण माहिती (सेक्शन क्रमांक 2777(इ)
  नोटिफिकेशन क्र.51) महसूल विभागाचे 5 डिसेंबर 2012 रोजीचे करिजेंडम (सेक्शन क्र.2835 (इ) अधिसूचना क्र.53) 6 डिसेंबर 2012 रोजी सेबीने कार्यपदधतीबाबतच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या.

- **इक्विटी बाजारात प्रथम वेळच्या गुंतवणूकदारांना आर्थिक नुकसान होणार नाही का? त्यांच्यासाठी ते धोकदायक ठरणार नाही काय?**
  सिक्युरिटीज मार्केटमधील इतर सर्वसामान्य गुंतवणूकदाराप्रमाणेच आरजीईएसएसमध्ये गुंतवणूक करणा-या गुंतवणूकदाराला इक्विटी बाजारात आर्थिक नुकसान होण्याची भीती असतेच. परतफेड होईलच याची योजनेमार्फत कोणतीही खात्री देण्यात येत नाही. त्यामुळे आरजीईएसएस अंतर्गत गुंतवणूक करणा-या गुंतवणूकदारांना योग्य ती खबरदारी घेण्याची सूचना देण्यात येते. या योजनेला बनविताना लार्ज कॅप स्टॉक घेण्यापासून गुंतवणूकदारांना रोखणे, मार्केटमधील सकारात्मक घडामोडींचा लाभ घेण्यासाठी लॉक इन कालावधीमध्ये योग्य ती लवचिकता आदी सावधगिरी पहिल्या वेळी गुंतवणूक करणा-या गुंतवणकदारांचे हित जपण्याकरता बाळगण्यात आली आहे. एक्स्चेंज ट्रेडेड फंड (इटीएफ) आणि म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीतील धोका कमी करण्यासाठी योजनेमध्ये योग्य ते निकष ठरविण्यात आले आहेत.

- **आमच्याकडे या आधीच इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्कीम आहेत (ईएलएसएस) मग आरजीईएसएसची आम्हाला गरज काय?**
  ईएलएसएस आणि आरजीईएसएस या पूर्णपणे भिन्न योजना आहेत. वेगवेगळया वर्गांसाठी या योजना आहेत. ईएलएसएसने पॅसिव्ह गुंतवणुकीचा मार्ग उपलब्ध होतो. तर आरजीईएसएस स्टॉक मार्केटमध्ये थेट गुंतवणुकीस प्रोत्साहन देते.

| कार्यपद्धतीतील फरक पुढील प्रमाणे | |
|---|---|
| ईएलएसएस | आरजीईएसएस |
| म्युच्युअल फंडात गुंतवणूक | नोंदणी केलेल्या इक्विटी किंवा म्युच्युअल फंड, ईटीएफ आदींचा समावेश असलेल्या इक्विटीमध्ये थेट गुंतवणूक करण्यात येते. |
| ईलएसएस अंतर्गत 100 टक्के परताव्याची मंजुरी (1,00,000 रुपयांपर्यंत) | आरजीईएसएस अंतर्गत फक्त 50 टक्के परतावा मंजूर आहे (जास्तीत जास्त 25,000 रुपयांपर्यंत) |
| ईएलएसएसचे लाभ हे प्राप्तिकर कायद्याच्या 80 सी या कलमांतर्गत येतात. एलआयसी पॉलिसी, पीपीएफ इत्यादींसाठीची एकत्रित मर्यादा 1,00,000 रुपये इतकी आहे. | आरजीईएसएसचा परतावा हा कलम 80 सीसीजी अंतर्गत मिळू शकतो. आरजीईएसएससाठी ही विशेष गुंतवणुकीची मर्यादा आहे 80 सीच्या मर्यादेपेक्षा जास्त |
| लॉक इन कालावधी 3 वर्षे इतका आहे. | लॉक इन कालावधी हा तीन वर्षे इतका आहे. एका वर्षानंतर काही अटींच्या अधीन राहून ट्रेडिंगची परवानगी आहे. |

| | |
|---|---|
| म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही त्यामानाने कमी धोकादायक असते. | इक्विटीमध्ये गुंतवणूक असल्याने धोक्याचे प्रमाण जास्त आहे. |

- **करबचतीच्या इतर योजनांशी तुलना करता आरईजीएसएसचे फायदे किंवा ठळक वैशिष्टये कोणती आहेत?**
  आरईजीएसएसचे फायदे पुढील प्रमाणेः
  ✓ कलम 80 सीसीजी अंतर्गत करबचतीचे 1 लाख रुपयांपेक्षा जास्तीच्या मर्यादेचे प्रमाण हे आयकर कायद्याच्या 80 सी अंतर्गत येते. यामुळे ती मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांसाठी जास्त आकर्षक ठरते.
  ✓ डिव्हिडंड इन्कम देखील करमुक्त असते.
  ✓ काही अटींच्या अधीन राहून गुंतवणूकदार पहिल्या वर्षाच्या गुंतवणुकीच्या नंतर लॉक इन कालावधीनंतर व्यवहार करण्यास किंवा पोर्टफोलियो बदलण्यास मोकळा असतो.
  ✓ आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीजच्या हायर मार्केट व्हॅल्युएशन केल्यानंतर मिळणारा फायदा एका वर्षानंतर कळून येतो. उदा. फिक्स्ड लॉक इन पिरियड, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत बाजारात होणा-या घसरणीपासून गुंतवणूकदाराचे संरक्षण करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदी.
  ✓ फिक्स्ड लॉक इन कालावधी संपल्यानंतर संकटाच्या काळात तुम्ही काही स्टॉक्स विकूही शकता.
  ✓ तुमच्या स्वतच्या आरईजीएसएस डिमॅट खात्यामधील 50,000 रुपयांपर्यंतच्या गुंतवणुकीपर्यंत जर तुम्ही बेसिक सर्व्हिस डिमॅट खात्याची मागणी केलीत तर डीमॅट खात्याच्या हाताळणीसाठी कोणताही वार्षिक खर्च वसूल करण्यात येत नाही. 2 लाख रुपयाच्या गुंतवणुकीपर्यंत तो 100 रुपये इतका घेण्यात येतो.
  ✓ टॅक्स परतावा मागण्याच्या पहिल्या आर्थिक वर्षात गुंतवणुक हस्याने भरता येते.

  **योजनेचे कव्हरेज : आरईजीएसएस अंतर्गत करण्यात येणारी गुंतवणूक आणि गुंतवणूकदार**

- **योजनेत कोणाला सहभागी होता येते? नवे गुंतवणूकदार कोण आहे?**
  ही योजना सर्व नव्या रिटेल गुंतवणूकदारांसाठी; ज्यांचे एकूण उत्पन्न हे 10 लाख रुपयांपेक्षा कमी किंवा समान असेल, त्यांच्यासाठी खुली असेल.

  नवीन रिटेल गुंतवणूकदार हे असतील :
  ✓ जो रहिवासी व्यक्ती असेल (कॉर्पोरेट संस्था किंवा विश्वस्त संस्थांसाठी हा फायदा लागू नसेल)
  ✓ ज्याने डीमॅट खाते उघडलेले नसेल व आरईजीएसएसमध्ये असे खाते उघडण्यापर्यंत डेरव्हेटिव्ह बाजारात व्यवहार केलेले नसतील.
  ✓ ज्यांनी डीमॅट खाते उघडलेले असेल पण आरईजीएसएसशी जोडण्यापूर्वी त्या खात्यात इक्विटी किंवा डेरिव्हेटिव्ह मार्केटमध्ये व्यवहार केलेला नसेल.

  संयुक्त खाते असल्यास फक्त पहिला गुंतवणूकदार हा अस्तित्वातील रिटेल गुंतवणूकदार म्हणून मानला जाईल. पहिल्या डीमॅट खातेदाराव्यतिरिक्त जे द्वितीय किंवा तिस-या क्रमांकाचे गुंतवणूकदार किंवा वारसदार (नॉमिनी) असतील ते नवीन आरईजीएसएस खाते उघडताना नवे रिटेल गुंतवणूकदार म्हणून ओळखले जातील.
  पहिला धारक म्हणून डीमॅट खाते उघडल्यास मात्र इक्विटी व डेरिव्हेटिव्ह संदर्भाने कोणतेही व्यवहार झाले नसल्यास पहिला खातेधारक हा पात्र असेल.
  खाते उघडताना नवीन रिटेल गुंतवणूकदाराला फॉर्म ए नुसार एक घोषणापत्र डिपॉझिटरी पर्टिसिपंटकडे (डीपी) द्यावे लागते. आरजीईएसएस अंतर्गत मिळणारे लाभ घेण्यासाठी सध्याचे डीमॅट खाते नेमावे लागते.
  त्यानंतर अशा खात्यात ज्या पात्र सिक्युरिटीज घेतल्या जातात त्या जर गुंतवणूकदाराने फॉर्म बी नुसार निर्देशित न केल्यास 50,000 रुपयांपर्यंतच्या मूल्यापर्यंतच्या सिक्युरिटीज आपोआपच लॉक इन होतात.

- **मी अनिवासी भारतीय आहे. मी आरजीईएसएससाठी पात्र ठरतो काय?**
  नाही.

- **माझ्याकडे म्युच्युअल फंड आणि किंवा एक्स्चेंज ट्रेडेड फंडची युनिटस आहेत. मग मी आरजीईएसएससाठी पात्र ठरतो काय?**
  होय. म्युच्युअल फंड आणि एक्स्चेंज ट्रेडेड फंडसमध्ये याआधी करण्यात आलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणूकदार योजनेसाठी अपात्र ठरत नाही. मात्र, आरजीईएसएस अंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आरजीईएसएस पात्र म्युच्युअल फंड आणि ईटीएफ योजनांमध्ये नव्याने गुंतवणूक करावी लागते.

- **माझ्याकडे काही फिजिकल शेअर्स आहेत मी आरजीईएसएससाठी पात्र ठरतो काय?**

होय. तुम्ही नवीन रिटेल गुंतवणूकदार म्हणून ओळखले जाल. फक्त आरजीईएसएसचे लाभ मिळविण्यासाठी तुम्हाला नव्याने गुंतवणूक करावी लागेल. अशा शेअर्सचे डिमटेरियलायझेशन केल्यास आरजीईएसएस अंतर्गत लाभ मिळविण्यासाठी तुम्हाला दावा करता येणार नाही.

- **योजनेअंतर्गत गुंतवणुकीचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत. आरजीईएसएस "पात्र सिक्युरिटीज" कोणत्या आहेत?**
  योजनेचे गुंतवणूक पर्याय इक्विटीच्या खालील प्रकारासाठीच मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत.

  <u>लिस्टेड इक्विटी शेअर्स</u>

  अ. एनएसई आणि बीएसईमधील सर्वात वरचे 100 शेअर्स म्हणजेच, सीएनएक्स-100, बीएसई-100 (याचा अर्थ असा नाही की फक्त एनएसई किंवा बीएसईद्वारेच व्यवहार करावे लागतील. बीएसई 100 किंवा सीएनएक्स 100 मध्ये नोंदणी केलेल्या सिक्युरिटीजचे कोणत्याही नव्या स्टॉक एक्स्चेंजमध्ये व्यवहार करता येतील. त्याच आरजीईएसएससाठी देखील पात्र असतील)

  ब. महाराष्ट्र सरकार, नवरत्न आणि मिनिरत्न यांनी श्रेणी ठरविलेल्या पब्लिक सेक्टर एंटरप्रायझेसचे स्टॉक्स

  क. स्टॉक एक्स्चेंजमध्ये लिस्टेड असणा-या आणि व्यवहार होणा-या स्टॉक्सचे एकत्रीकरण (अ) किंवा/आणि (ब) आणि डिपॉझिटरी सिस्टिमद्वारे सेटल होणा-या (उदा.एक्स्चेंज ट्रेडेड फंडस (इटीएफ)/म्युच्युअल फंड(एमएफ) स्किम्स ज्या आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीज असतील व ज्या (अ) आणि किंवा (ब) मध्ये निर्देशित असतील. त्या स्टॉक एक्स्चेंजमध्ये लिस्टेड असाव्यात व त्यांचे व्यवहार होत असावेत आणि डिपॉझिटरी प्रक्रियेने त्या सेटल होत असाव्यात)

  ड. (अ) आणि (ब) च्या फॉलो ऑन पब्लिक ऑफर्स (एफपीओज)

  इ. न्यू फंड ऑफर्स (एनएफओज) (सी) च्या आणि वर

  <u>अनोंदणीकृत इक्विटी शेअर्स</u>

  फ. पीएसयूजच्या इनिशिअल पब्लिक ऑफर्स (आयपीओ), ज्या त्या आर्थिक वर्षात लिस्टेड होणार आहेत आणि ज्यात सरकारची भागीदारी ही किमान 51 टक्के असेल व मागील तीन वर्षांत दरवर्षी कंपनीची वार्षिक उलाढाल 4,000 कोटींपेक्षा कमी नको. (गुंतवणुकीचे निकष हे गुंतवणुकीच्या वेळी लागू होणार असतील)

- **अशा पात्र सिक्युरिटीजची माहिती मला कुठे मिळू शकेल?**
  एक्स्चेंजेस, डिपॉझिटरीज, एमएफआयच्या वेबसाइट्सवर पात्र सिक्युरिटीजची अद्ययावत माहिती वेळोवेळी अपडेट केली जाते.
  अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सेबी, एनएसई, बीएसई, एनएसडीएल, सीडीएसएल आणि एएमएफआयच्या वेबसाइट्सवरील संबंधित पाने वाचावीत.
  पात्र आयपीओंच्या संदर्भात, कंपनी त्यांच्या कागदपत्रांत किंवा जाहीरातींमध्ये माहिती देऊ शकते.

- **टॉप 100 सिक्युरिटीज पर्यंतच आरजीईएसएस गुंतवणूक मर्यादित का?**
  इक्विटी मार्केटमध्ये प्रथमच व्यवहार करणा-या गुंतवणूकदारांसाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. बीएसई 100 किंवा सीएनएक्स 100 आणि मोजक्याच पीएसयू स्टॉकपर्यंत गुंतवणूकीचे पर्याय मर्यादित ठेवण्यात आले आहेत. कारण यात धोका कमी असतो. लिक्विडीटी जास्त असते. तसेच बाजारात अधिक माहिती आणि विश्लेषण उपलब्ध असते. 100 स्टॉक्सच्या रेंजमुळे गुंतवणूकदारांना विविधता मिळते.

- **विशेषतः एखादा स्टॉक बीएसई 100 मधील असला तर मी गुंतवणूक कधी करू जर एक्स्चेंजने भविष्यात जर तो स्टॉक बीएसई 100 च्या यादीतून कमी केला तर करपरतावा (रिटर्न) भरताना माझी गुंतवणूक आरजीईएसएससाठी पात्र असेल काय?**
  गुंतवणूक करतेवेळीच तो स्टॉक बीएसई 100 किंवा सीएनएक्स 100 मध्ये असणे आवश्यक आहे. म्हणजेच सीएनएक्स 100 / बीएसई 100 मधून एखादा स्टॉक बाहेर पडला तरी गुंतवणूकदार हा आरजीईएसएसच्या लाभासाठी पात्र ठरतो. मात्र आरजीईएसएसच्या पोर्टफोलिओमधून तो स्टॉक विकण्यापुरताच त्याला अधिकार मिळतो. त्याने जर त्याची पुनर्खरेदी केली किंवा सध्याच्या स्टॉकमध्ये त्याची भर घातली तर मात्र अतिरिक्तचा स्टॉक आरजीईएसएसच्या पोर्टफोलिओमध्ये धरला जात नाही.

- **मार्च महिन्यात मी आयपीओसाठी अर्ज केला आहे. मात्र कंपनी मार्च महिन्यात स्टॉक एक्स्चेंजमध्ये लिस्टेड होणार आहे म्हणजेच पुढील आर्थिक वर्षात. मग ही गुंतवणूक पात्र असेल काय?**
  नाही. विद्यमान आर्थिक वर्षातच जर ती कंपनी लिस्टेड होणार असेल तरच गुंतवणूक पात्र ठरते.

- **सिक्युरिटीज मार्केटमध्ये मी अधिकाधिक किती रक्कम गुंतवू शकतो? हप्त्याहप्त्याने मी ती भरू शकतो का?**
  सिक्युरिटीज मार्केटमध्ये जास्तीत जास्त किती गुंतवणूक करायची याची मर्यादा ठरविण्यात आलेली नाही. मात्र आरजीईएसएसचे लाभ

फक्त 50,000 रुपयांपर्यंतच्या पात्र सिक्युरिटीजपुरतीच मर्यादित आहे. हप्त्यांमध्ये गुंतवणूक करता येते. मात्र लाभ फक्त पहिल्या आर्थिक वर्षात केलेल्या गुंतवणूकीवरच मिळतात. कलम 80 सीसीजी अंतर्गत त्यासाठी दावा करता येतो. मात्र जर हप्त्यांमध्ये तुम्ही गुंतवणूक करणार असलात तर त्याच आर्थिक वर्षात तुम्ही सर्व हप्ते भराल याची खात्री करून घ्या. (ते वर्ष तुमचे डीमॅट खाते उघडून ते आरजीईएसएसशी संलग्न करण्याचे असायला हवे) त्यापुढील गुंतवणूक ही आरजीईएसएसशी संलग्न मानण्यात येणार नाही.

- **दोन आर्थिक वर्षांत मी आरजीईएसएस अंतर्गतची गुंतवणूक विभागू शकतो काय आणि परताव्याचा दावा करू शकतो काय?**
  नाही. फक्त त्याच आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या गुंतवणुकीवर तुम्ही आरजीईएसएस अंतर्गत परताव्याचा दावा करू शकता?

- **आरजीईएसएस अंतर्गत मला किती कर परतावा मिळू शकतो?**
  गुंतवण्यात आलेल्या रक्कमेच्या 50 टक्के पर्यंत कर परतावा तुम्हाला 80 सीसीजी या कलमांतर्गत मिळू शकतो. समजा जर तुम्ही आरजीईएसएस इंतर्गत 50 हजार रुपयांची गुंतवणूक केलीत तर तुमच्या करपात्र उत्पन्नातून 25 हजार रुपयांचा कर परतावा मिळू शकतो. समजा जर तुम्ही आरजीईएसएस अंतर्गत 40 हजार रुपयांपर्यंतची गुंतवणूक केलीत तर तुमच्या करपात्र उत्पन्नातून 20 हजार रुपयांचा करपरतावा मिळू शकतो. हा करपरतावा 80 सी अंतर्गत स्पष्ट करण्यात आलेल्या 1 लाख किंवा त्यावरीलच्या मर्यादेसाठीचा असतो.

  वेगळया शब्दांत सांगायचे झाले तर जे इन्कम टॅक्सच्या 10 टक्क्यांच्या ब्रॅकेटमध्ये आहेत. आरजीईएसएस अंतर्गत 50,000 रुपयांची गुंतवणूक करून 2,500 रुपयांची बचत करू शकतो. (अधिक सेस लागू) आणि जे 20 टक्क्यांच्या इन्कम टॅक्स ब्रॅकेट मध्ये आहेत. त्यांना टॅक्स मधून 5,000 रुपयांची बचत होते. (अधिक सेस लागू)

- **मी याआधीच कलम 80 सी अंतर्गत टॅक्स मधून परतावा मागितला आहे. मग मला आरजीईएसएसचा लाभ मिळू शकेल काय?**
  होय मिळू शकतो. 80 सीसीजी अन्वये आरईजीएसएस अंतर्गत मिळणारा कर परतावा 80 सी मध्ये दर्शविलेल्या 1 लाख रु.व त्यापेक्षा अधिकच्या मर्यादेसाठी आहे. आरईजीएसएससाठीच्या कलम 80 सीसीजी अंतर्गत गुंतवणूक करताना नागरिकांना 80 सी अंतर्गत घातलेल्या मर्यादेचे उल्लंघन करणे बंधनकारक नसते.

- **मी 50,000 रुपयांपेक्षा जास्तीची गुंतवणूक करून आरईजीएसएस अंतर्गत कर परतावा मागू शकतो काय?**
  तुम्ही आरईजीएसएस अंतर्गत उघडण्यात आलेल्या डिमॅट खात्याद्वारे कितीही गुंतवणूक करू शकता मात्र या योजनेअंतर्गत फक्त 50,000 रुपयांपर्यंतच्याच गुंतवणुकीवर लाभ मिळवू शकता. मात्र आरईजीएसएस अंतर्गत लाभांचा दावा करताना 50,000 रुपयांपर्यंतच्या लॉक इन करिता स्टॉक्स निवडण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला आहे. आरईजीएसएस अंतर्गत उघडण्यात आलेल्या डिमॅट खात्यातील 50,000 रुपयांपर्यंतच्या गुंतवणुक केलेल्या पात्र स्टॉक्सना डिपॉझिटरी आपोआपच लॉक इन करत असते. पहिल्या वर्षात आरईजीएसएस अंतर्गत न ठेवायच्या गुंतवणुकीबाबत व्यवहाराच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत फॉर्म बी भरून डिपॉझिटरी पार्टिसिपंटना तुम्हाला तसे कळवावे लागते. अशा सिक्युरिटीज कधीही विकण्याचे अधिकार तुम्हाला असतात. मात्र पहिल्या वर्षात कर परतावा मागताना अशा सिक्युरिटीज तुम्हाला आरईजीएसएस अंतर्गत आणता येत नाहीत. पुढील वर्षांत फ्लेक्सिबल लॉक इन पिरियडच्या काळात जर त्या आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीज असतील तर त्या आरईजीएसएस पोर्टफोलिओअंतर्गत गणल्या जातात.

- **मी 'अ' कंपनीचे आरईजीएसएस अंतर्गत 70 हजार रुपयांस पात्र असलेल्या सिक्युरिटीज विकत घेतल्या आहेत मग मी 50,000 रुपयांच्या पुढील गुंतवणूक मुक्त कशी करू शकतो?**
  तुम्ही जर आरईजीएसएस अंतर्गत 70,000 हजार रुपयांचे शेअर्स घेतले आहेत तर डिपॉझिटरीज कडून फक्त 50,000 रुपयांचेच शेअर्स फिक्स्ड लॉक इन मध्ये ठेवण्यात येतील. 20,000 रुपयांचे शेअर्स लॉक इन करण्यात येणार नाहीत. तुम्हाला जर लॉक इन मध्ये ठेवण्यासाठी विशिष्ट शेअर्स निवडायचे असतील तर प्र.क्र.21 मध्ये सांगितल्या प्रमाणे डिपॉझिटरीला कळवायला हवे.

- **फॉर्म बी मी कधी भरू शकतो त्याला काही मर्यादा आहे काय?**
  आरईजीएसएसच्या अटी आणि शर्तींच्या बाहेर जर तुम्हाला काही सिक्युरिटीज ठेवायच्या असतील तर डिपॉझिटरी पार्टिसिपंटला फॉर्म बी द्वारे तसे कळवायला हवे. सिक्युरिटीच्या खरेदीपासून किंवा ताबा मिळाल्यापासून एका महिन्याच्या आत असा फॉर्म भरून देणे आवश्यक असते.

  अधिसूचनेनुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर एक महिन्याच्या आत म्हणजेच 30 एप्रिलपर्यंत आरईजीएसएस लाभधारकांची माहिती डिपॉझिटरीजनी इन्कम टॅक्स विभागाला देणे आवश्यक असते. तुमच्या गुंतवणुकीबाबत डिपॉझिटरीज कडून इन्कम टॅक्स विभागाला चुकीची माहिती जाउ नये म्हणून तुम्ही डिपॉझिटरी पार्टिसिपंटना फॉर्म बी भरून त्यात मार्च महिन्यात मिळालेल्या क्रेडिटची माहिती

द्यायची असते. मार्च महिन्यात किंवा जास्तीत जास्त 15 एप्रिलपर्यंत ती तुम्ही देऊ शकता.

- **फॉर्म बी मध्ये सूचित केलेल्या पात्र सिक्युरिटीजच्या रकमेवर मी करपरताव्याचा दावा करू शकतो काय?**
  नाही.

**योजनेतील सहभाग : प्रक्रियात्मक आणि कार्यात्मक विषय**

- **मी आरईजीएसएस पात्र गुंतवणूक कशी करू शकतो?**
  कोणत्याही डीपीकडून नवीन डीमॅट खाते उघडा व आरईजीएसएस अंतर्गत नामनिर्देशित करा किंवा फॉर्म ए भरून तुमचे सध्याचे डीमॅट खाते आरईजीएसएसशी संलग्न करा. तुम्हाला जर बेसिक सर्व्हिस डीमॅट खात्याची सुविधा हवी असेल तर तुमचे खाते त्यानुसार संलग्न करण्यासाठी तुमच्या डीपीला सांगू शकता.

  पात्र सिक्युरिटीजची खरेदी करायची असल्यास किंवा पात्र आयपीओसाठी अर्ज करायचा असेल तर त्यासाठी खाते उघडण्यासाठी तुम्ही सेबीकडे नोंदणी केलेल्या कोणत्याही स्टॉक ब्रोकरशी संपर्क साधू शकता.

  जर तुम्ही कोणा वितरकाकडून म्युच्युअल फंडात गुंतवणूक करत असाल तर त्या डीमॅट खात्यात म्युच्युअल फंडचे क्रेडिट मिळवायचे असेल तर तुमच्या डीमॅट खात्याचा क्रमांक आणि डीपी आयडी तुम्ही त्यासाठी द्यायला हवे.

- **पात्र सिक्युरिटीज होल्ड करण्याची प्रक्रिया काय असेल?**
  आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीज होल्ड करण्याची पद्धत म्हणजे डीमॅट खात्याद्वारे ती होल्ड करता येतात. आरईजीएसएसचे लाभ घेण्यासाठी त्या सिक्युरिटीज फिजिकल स्वरूपात तुम्ही होल्ड करू शकत नाही.

- **माझे म्युच्युअल फंड व ईटीएफ युनिटही डीमॅट स्वरूपात करण्याची गरज आहे काय?**
  होय. तुमचे म्युच्युअल फंड युनिट डीमॅट स्वरूपात बदलण्यासाठी तुमच्या असेट मॅनेजमेंट कंपनी किंवा आरटीएला तशी विनंती करा. अधिक माहितीसाठी सीडीसीएल आणि एनएसडीएलच्या सूचना/मार्गदर्शक तत्वे पाहा.

- **आरईजीएसएसचे लाभ मिळविण्यासाठी गुंतवणूकदाराला केवळ त्याचसाठीचे डीमॅट खाते उघडण्याची आवश्यकता आहे काय? मी इतर सिक्युरिटीज होल्ड करू शकतो काय उदा. माझ्या डीमॅट खात्यातील आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीज व्यतिरिक्त?**
  आरईजीएसएसचे लाभ घेण्यासाठी स्वतंत्र असे डीमॅट खाते उघडण्याची आवश्यकता नाही. आरईजीएसएसचे लाभ ज्या डीमॅट खात्यातून मिळतात त्यात आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीज व्यतिरिक्त इतरही शेअर्स/सिक्युरिटीज ठेवता येतात. आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीज नसलेल्या शेअर्समधील गुंतवणुकीवर आरईजीएसएसचा काहीही संबंध नसतो किंवा त्यावर आरईजीएसएस अन्वये करपरतावा देखील लागू होत नाही.

- **ऑफ मार्केट व्यवहार किंवा डिमटेरियलायझेशनद्वारे जे क्रेडिट डीमॅट खात्यात जमा होईल त्यावर आरईजीएसएस अंतर्गत मिळणारे लाभ मिळू शकतील काय?**
  नाही. मात्र फ्लेक्सिबल लॉक इन काळाच्या वर्षांमध्ये (म्हणजेच पहिल्या वर्षानंतर) सर्व आरईजीएसएस पात्र सिक्युरिटीज या गुंतवणूकदाराचा स्कीमसोबतचा कम्प्लायन्स पाहण्यासाठी धरण्यात येतील. मग त्या ऑफ मार्केट मधून येवोत किंवा डिमटेरियलाझेशन मधून आलेल्या असोत.

- **डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) सोबत आरजीईएसएसचे डीमॅट खाते मी कसे काय उघडू शकतो?**
  आरईजीएसएस साठीचे डीमॅट खाते उघडण्यासाठी तुम्ही कोणत्याही नोंदणी केलेल्या डीपीशी संपर्क साधू शकता. एनएसडीएल आणि सीडीएसएल कडे नोंदणी केलेल्या डिपींची यादी तुम्ही येथे (http://www.sebi.gov.in/sebiweb/ home/list/5/33/0/0/Recognised-Intermediaries) पाहू शकता. आरईजीएसएसचे लाभ मिळविण्यासाठी सेबीने निश्चित केलेली नो युवर क्लायंट (केवायसी) प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता तुमच्या ओळखीचा, निवासी पत्त्याचा पुरावा, पॅन क्रमांक हे सर्व तसेच दिलेल्या नमुन्यातील घोषणापत्र (म्हणजेच फॉर्म ए) भरून ज्या डीपीकडे डीमॅट खाते उघडायचे असेल त्याकडे द्यावे लागते.
  अधिक माहितीसाठी एनएसडीएल आणि सीडीसीएलने दिलेले एफएक्यू पाहा.

- **मी ट्रेडिंग खाते कसे काय उघडू शकतो?**
  तुमचे कॅपिटल मार्केटमधील व्यवहार करण्यासाठी तुम्ही सेबीकडे नोंद असलेल्या ब्रोकर (ट्रेडिंग मेंबर) किंवा सब ब्रोकरशी संपर्क साधू शकता. सेबीच्या वेबसाइटवर नोंदणी असलेल्या ब्रोकर्स/सब ब्रोकर्सची यादी तुम्ही पाहू शकता.

- **डीमॅट किंवा ट्रेडिंग खाते उघडण्यासाठी मला कोणकोणत्या कागदपत्रांची गरज लागेल?**
  खाते उघडण्याच्या फॉर्मसोबत तुम्हाला पुढील गोष्टी सादर कराव्या लागतील. इतर व्यक्तींसोबत संयुक्त खाते उघडावयाचे असल्यास सर्व खातेदारांनी पुढील गोष्टी सादर करणे आवश्यक राहील.

  पॅनकार्डची स्वसाक्षांकित प्रत (सेल्फ अटेस्टेड कॉपी) आणि लहान आकाराचे (पासपोर्ट साईझ) छायाचित्र देणे सर्वांसाठी बंधनकारक राहील. अर्जदाराने सादर केलेली सर्व कागदपत्रांच्या प्रती सेल्फ अटेस्टेड असणे आवश्यक आहे. मूळ कागदपत्रे दाखविणे आवश्यक आहे. जर कोणत्याही कागदपत्रांची मूळ प्रत आणणे शक्य न झाल्यास मान्यताप्राप्त व्यक्तीकरून ती कागदपत्रे अटेस्टेड करून घेणे आवश्यक आहे.

  **ओळखीचा पुरावा**
  ✓ पासपोर्ट
  ✓ मतदार आयडी कार्ड
  ✓ ड्रायव्हिंग लायसन्स
  ✓ फोटोसह असलेले पॅनकार्ड
  ✓ आधार (युनिक आयडी) कार्ड
  ✓ आयडेंटिटी कार्ड, अर्जदाराच्या फोटोसह असलेले कागदपत्र, यांनी जारी केलेले अ) केंद्र/राज्य सरकार आणि त्यांचे विभाग, ब) स्टॅट्युटरी/रेग्युलेटरी अँथॉरिटीज, क) पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग्ज, ड) शेडयुल्ड कमर्शियल बँक, इ) पब्लिक फायनान्शियल इन्स्टिटयूशन्स, फ) विद्यापीठांशी संलग्न असणारी कॉलेजेस (अर्जदार ज्या काळापर्यंत विद्यार्थी असेल त्या काळापर्यंतच), ग) आयसीएआय, आयसीडब्ल्यूएआय, आयसीएसआय, बार काउन्सिल इ. संस्थांनी त्यांच्या सदस्यांना जारी केलेले, आणि ह) बँकांनी जारी केलेली क्रेडिट/डेबिट कार्डस

  **पत्त्याचा पुरावा**
  ✓ रेशन कार्ड
  ✓ पासपोर्ट
  ✓ मतदार आयडी कार्ड
  ✓ ड्रायव्हिंग लायसन्स
  ✓ बँक पासबुक
  ✓ वीज बिल,गॅस बिल (दोन महिन्यापेक्षा जास्त जुनी नको), निवासी दूरध्वनीचे बिल (दोन महिन्यापेक्षा जास्त जुने नको), घराचे रजिस्टर्ड लीज किंवा सेल अॅग्रीमेंट, फ्लॅट मेंटेनन्स बील, इन्शुरन्स कॉपी
  ✓ बँक अकाऊंट स्टेटमेंट/पास बुक
  ✓ उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या खात्याशी संबंधित नवीन पत्ता असल्यास त्यांचा स्वयंघोषित जाहीरनामा
  ✓ खालील पैकी कोणीही निवासी पत्त्याचा पुरावा दिला असल्यास
  ✓ शेडयुल्ड कमर्शियल बँक/ शेडयुल्ड को-ऑपरेटिव्ह बँक/मल्टीनॅशनल फॉरीन बँक यांचे मॅनेजर्स/गॅझेटेड ऑफिसर/नोटरी पब्लिक/आमदार/खासदार/सरकारी किंवा वैधानिक मंडळाकडून जारी करण्यात आलेली कोणतीही कागदपत्रे

    पत्त्यासह यांनी जारी केलेली ओळखपत्रे/पत्त्याची कागदपत्रे : केंद्र व राज्य सरकार व त्यांचे विभाग, वैधानिक-नियामक मंडळे, पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग, शेडयुल्ड-कमर्शियल बँक, पब्लिक फायनान्शियल इन्स्टिटयूशन्स, युनिव्हर्सिटींशी संलग्न कॉलेजेस (जर या संबंधी अर्जदार विद्यार्थी असल्यास), आयसीएआय, आयसीडब्ल्यूएआय, बार काउन्सिल यासारख्या संस्थांनी त्यांच्या सदस्यांना दिलेली ओळखपत्रे

    कागदपत्रे अटेस्ट करण्यास पात्र व्यक्तींची यादीः नोटरी पब्लिक, गॅझेटेड ऑफिसर, शेडयुल्ड कमर्शियल बँक/ को-ऑपरेटिव्ह बँक किंवा मल्टीनॅशनल फॉरीन बँक यांचे मॅनेजर्स (कॉपीवर नाम,पदनाम आणि सील आवश्यक)

    तुमच्या डीपी/ट्रेडिंग मेंबरकडे व्हेरिफिकेशनसाठी जाताना मूळ कागदपत्रे घेउन जाणे आवश्यक आहे.तुमचा डीपी/ ट्रेडिंग मेंबर हा ओळख/पत्त्याच्या अतिरिक्त पुराव्यांची मागणी करू शकतो.

- **मी पॅनची गरज नसलेल्या श्रेणीत येतो (सिक्किमचा रहिवासी). पॅनशिवाय मी आरजीईएसएस खाते उघडू शकतो काय?**
  आरजीईएसएसचे लाभ मिळविण्यासाठी तुम्ही जरी पॅनची गरज नसलेल्या श्रेणीत येता तरीही पॅन अत्यावश्यक करण्यात आले आहे. पॅन कार्ड कसे मिळवावे याबाबतची अधिकची माहिती इथे (https://tin.tin.nsdl.com/pan/index.html) पाहा.

- **माझ्या ट्रेडिंग आणि डीमॅट खात्याच्या व्यवहारासाठी मी इंटरनेट अॅक्सेस मागावा काय?**

होय. तो अधिक सोयीचा ठरेल. तुमच्या खात्यावर सातत्याने लक्ष ठेवणे तसेच सिक्युरिटीजची किंमत कळणे त्यामुळे अधिक सोयीचे ठरेल.

- **आरजीईएसएस अंतर्गत मी सध्याचे डीमॅट खाते नोंदवू शकतो काय?**

  होय. आरजीईएसएस अंतर्गत तुम्ही जर नवीन रिटेल गुंतवणूकदार असाल तर. तुमचे सध्याचे डीमॅट खाते आरजीईएसएस अंतर्गत नोंदविण्यासाठी तुम्हाला ठरवून दिलेल्या फॉरमॅटमध्ये तुमच्या डीपीला घोषणापत्र भरून द्यावे लागेल. (तो म्हणजे फॉर्म ए)

- **फॉर्म ए फॉर्म बी इत्यादी मी कुठून घेउ शकतो?**

  फॉर्म ए आणि फॉर्म बी तुमच्या डीपी कडून घेऊ शकता किंवा वेबसाइटवरून थेट डाऊनलोड करू शकता. डाऊनलोड करण्यासाठी येथे (http://investor.sebi.gov.in/rgess.html) पहा.

- **आरजीईएसएससाठी मी एकापेक्षा जास्त डीमॅट खात्याला निर्देशित करू शकतो काय?**

  नाही. तुम्ही आरजीईएसएस अंतर्गतच्या खात्यासाठी फक्त एकच डीमॅट खाते निर्देशित करू शकता.

- **आरजीईएसएससाठी कमी खर्चाचे डीमॅट खाते असते काय?**

  जास्त आर्थिक व्यवहार व्हावेत, डीमॅट खात्यांची संख्या वाढण्यास प्रोत्साहन मिळावे आणि एकटया रिटेल गुंतवणूकदारांना डीमॅट खात्यात सिक्युरिटीज ठेवण्यास कमी खर्च यावा यासाठी 27 ऑगस्ट 2012 रोजी असा निर्णय घेण्यात आला आहे की, जे एकटे किंवा पहिले गुंतवणूकदार असतील अशा गुंतवणूकदारांसाठी सर्व डिपॉझिटरी पार्टिसिपंटसनी (डीपी) मर्यादित सेवांचे 'बेसिक सर्व्हिस डीमॅट अकाउंट' (बीएसडीए) उघडून द्यावे. मात्र अशा डीमॅट खात्यातील सिक्युरिटीजची किंमत कोणत्याही वेळी 2 लाख रुपयांपेक्षा अधिक असू नये. अशा डीमॅट खात्यांसाठी होल्डिंगची किंमत 50,000 रुपये असेल तर डीपींनी वार्षिक मेंटेनन्स चार्ज(एएमसी) घेऊ नये.50,000 ते 200,000 रुपयांपर्यंत एएमसी 100 रुपयांपेक्षा जास्त घेऊ नये. पहिल्यावेळी गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार हे बीएसडीए चा वापर करून त्यांचे आरजीईएसएस खाते बीएसडीए खाते म्हणून दाखवून इक्विटी मार्केटमध्ये व्यवहारांवरील खर्चात कपात करू शकतात. डीमॅट खाती उघडण्यासाठी विविध डिपॉझिटरी पार्टिसिपंटस किती शुल्क घेतात ते एनएसडीएल आणि सीडीएसएलच्या वेबसाइटवर तुम्ही जाणून घेऊ शकता.

- **सिक्युरिटीज मार्केटमध्ये व्यवहार करताना कोणती सावधगिरी बाळगावी?**

  यासाठी सेबीची मार्गदर्शक तत्वे पहावीत. सावधगिरीच्या सल्ल्यासाठी बीएसई आणि एनएसईच्या वेबसाइटस पाहाव्यात. एनएसडीएल आणि सीडीएसएल यांचे गुंतवणूकदारांसाठीची मार्गदर्शक पुस्तिकाही पाहावी.

  गुंतवणूकदारांच्या मार्गदर्शनासाठी सेबीची वेबसाइट ही सर्वसमावेशक असून सेबीकडून ती सातत्याने अद्ययावत देखील करण्यात येत असते. (http://www.investor.sebi.gov.in/) सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करण्याआधी या वेबसाइटवर देण्यात आलेली माहिती निश्चित वाचून घ्यावी.

- **सिक्युरिटीज मार्केटमधील माझ्या व्यवहारांबाबत मला काही तक्रार नोंद करायची असेल तर ती मी कशी करू शकतो?**

  तक्रार नोंद करायची असेल तर प्रथम तुम्ही संबंधित कंपनी/मध्यस्थ यांच्याशी संपर्क साधा.गुंतवणूकदारांच्या तक्रारी सोडविण्यासाठी सेबीने सर्व स्टॉक एक्स्चेंजेस, रजिस्टर्ड ब्रोकर्स, सब-ब्रोकर्स, डिपॉझिटरीज, म्युच्युअल फंडस आणि लिस्टेड कंपन्यांना विशेष ई-मेल आयडी तयार करण्यास तसेच एक अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत.

  जर कंपनी किंवा मध्यस्थाच्या पातळीवर तक्रारीचे निवारण झाले नाही तर तुम्ही संबंधित डिपॉझिटरी/एक्स्चेंजशी संपर्क साधू शकता.

  सिक्युरिटीज मार्केटमधील तक्रारींचे जलद गतीने निराकरण करण्यासाठी डिपॉझिटर्स आणि स्टॉक एक्स्चेंजने इन्व्हेस्टर ग्रिव्हन्स रिड्रेसल सेलची स्थापना केली आहे. डिफॉल्ट झालेल्या ब्रोकर्सकडील गुंतवणूकदारांच्या दाव्याची पूर्तता करण्यासाठी एक्स्चेंजेसनी इन्व्हेस्टर्स प्रोटेक्शन फंडची (आयपीएफ) देखील स्थापना केली आहे. ब्रोकर्स/डिपॉझिटरी पार्टिसिपंटस आणि गुंतवणूकदार यांच्यात एक्स्चेंजेस आणि डिपॉझिटर्स हे लवादाची देखील भूमिका बजावतात. गुंतवणूकदारांच्या तक्रारींचे निराकरण नेमके कसे होते हे जाणून घेण्यासाठी बीएसई,एनएसई आणि एनएसडीएल आणि सीडीएसएल या डिपॉझिटरीजच्या वेबसाइटस पाहा.

  एक्स्चेंजेस/डिपॉझिटरीजच्या पातळीवर जर तक्रारींचे निराकरण झाले नाही तर तुम्ही मार्केटवर नियंत्रण ठेवणा-या सेबीकडे देखील करू शकता. इश्यू आणि ट्रान्सफर ऑफ सिक्युरिटीज आणि लिस्टेड कंपन्यांचे डिव्हिडंड न मिळणे याबाबतच्या तक्रारी सेबी थेट घेते. त्या व्यतिरिक्त आपल्याकडे नोंद असलेल्या म्युच्युअल फंडस, स्टॉक ब्रोकर्स आणि संबंधित विषयांसंदर्भातील तक्रारी देखील सेबी घेते. इश्यू प्रक्रियेसंदर्भात गुंतवणूकदारांच्या असणा-या तक्रारी सोडविण्यासाठी देखील सेबीने यंत्रणा निर्माण केली आहे.

8 जून 2011 पासून सेबीने इंटरनेटच्या सहाय्याने नवीन केंद्रीय तक्रार निवारण यंत्रणा जिला स्कोअर्स (सेबी कम्प्लेंट रिड्रेस सिस्टिम) (http://scores.gov.in/Default.aspx) म्हणतात ती सुरू केली आहे. तक्रार नोंदविण्यापासून ते सेबी तक्रारीचे निराकरण करेपर्यंतची सर्व प्रक्रिया ही ऑनलाइन असते आणि तक्रारीचे स्टेटस हे संबंधित वेबसाइटवर कधीही पाहता येते.

ज्या गुंतवणूकदाराला स्कोअर्स (http://scores.gov.in/Default.aspx) कळत नाही किंवा त्याला स्कोअर्सचा ॲक्सेस नाही असा गुंतवणूकदार लेखी तक्रारअर्ज देखील भरून देऊ शकतो. अशा तक्रारी स्कॅन करून त्यांचे निराकरण करण्यासाठी स्कोअर्सवर अपलोड केल्या जातात. वापरकर्त्यांकडून ॲक्शन टेकन रिपोर्टस ऑनलाइनरित्या अद्ययावत करण्यासाठी सर्व तक्रारी या ऑनलाइन मोड मध्येच स्वीकारण्यात येतात.

गुंतवणूकदार हा त्याच्या तक्रारी ‘asksebi@sebi.gov.in या ई-मेल पत्त्यावर पाठवू शकतो. त्याच्या प्रश्नांची उत्तरे त्यास मिळतात.

संपूर्ण भारतातील गुंतवणूकदारांसाठी 1800 22 7575/ 1800 266 7575 हा टोल फ्री क्रमांक देखील उपलब्ध असून तो 14 भाषांत उपलब्ध आहे.या भाषा पुढील प्रमाणे, इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती, तामिळ, बंगाली, मल्याळम, तेलुगू, ऊर्दू, ओरिया, पंजाबी, कन्नड, आसामी आणि काश्मिरी. ही टोल फ्री हेल्पलाइन ही सर्व दिवशी (सार्वजनिक सुटटया वगळून) सकाळी साडेनऊ ते साडेपाच अशी सुरू असते. सेबीने विविध ठिकाणच्या लोकांना सुविधा मिळावी यासाठी बंगळूरू, भुवनेश्वर, चंदिगड, गुवाहाटी, हैद्राबाद, इंदूर, जयपूर, कोची, लखनौ आणि पाटणा येथे स्थानिक कार्यालयेदेखील उघडली आहेत.

तुमच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी किंवा सूचना करण्यासाठी तुम्ही केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार (इकॉनॉमिक अफेअर्स) विभागातील कॅपिटल मार्केटस डिव्हिजनशी देखील संपर्क साधू शकता.

**लॉक इन कंडिशनची अंमलबजावणी आणि आरजीईएसएस अंतर्गत सिक्युरिटीजचे मूल्य**

- **कर परतावा मिळण्यासाठी आरजीईएसएस अंतर्गत करण्यात आलेल्या सुरुवातीच्या गुंतवणुकीचे मूल्य कसे ठरविण्यात येते?**
  आरजीईएसएस अंतर्गत करपरतावा मिळविण्यासाठी सुरुवातीची जी 50,000 रुपयांची गुंतवणूक आहे तिचे मूल्य पात्र सिक्युरिटीजच्या मूल्यावरून ठरविण्यात येते. याचा अर्थ त्यात ब्रोकरेज चार्जेस, सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स, स्टॅम्प डयुटी, सर्व्हिस चार्ज आणि स्टॉक ब्रोकरकडून देण्यात आलेल्या कॉन्ट्रक्ट नोटमध्ये दर्शविण्यात आलेले सर्व टॅक्स यांना त्यात धरण्यात येत नाही. घेतानाची किंमत ही (विशिष्ट क्वांटिटी विकत घेतानाची किंमत) ही डिपॉझिटरीज थेट स्टॉक एक्स्चेंजकडून घेतात व त्यावर व्यवहार होतात. तुमच्या ब्रोकरकडून जी कॉन्ट्रक्ट नोट मिळते त्यातून आरजीईएसएस अंतर्गत सुरुवातीची गुंतवणूक किती आहे याची माहिती मिळवू शकता.

- **आरजीईएसएस अंतर्गत करण्यात आलेल्या गुंतवणूकीचा होल्डिंग कालावधी किती असतो?**
  आरजीईएसएस अंतर्गत करण्यात आलेल्या गुंतवणूकीचा कालावधी हा तीन वर्षांचा असून त्यात एका वर्षाचा फिक्स्ड लॉक इन आणि दोन वर्षांचा फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीचा समावेश असतो?

  उदाहरण
  आपण असे म्हणूया की तुम्ही आरजीईएसएस संलग्न डीमॅट खात्यातून 31 डिसेंबर 2012 रोजी 50,000 रुपयांच्या पात्र सिक्युरिटीजची खरेदी केली.30 डिसेंबर 2013 पर्यंत या पात्र सिक्युरिटीज ‘फिक्स लॉक इन’ मध्ये राहतील तर 30 डिसेंबर 2015 पर्यंत त्या ‘फ्लेक्सिबल लॉक इन’ मध्ये राहतील.


  आरजीईएसएस अंतर्गत करण्यात आलेली गुंतवणूक तीन वर्षांच्या आत जर तुम्हाला विकायची झाल्यास फिक्स लॉक इन कालावधी पूर्ण झाल्यानंतरच काही अटींची पूर्तता करून ती तुम्ही विकू शकता.

  एकदम केलेली किंवा हप्त्यात केलेल्या गुंतवणुकीची लॉक इन टाइम लाइन कशी असते हे आपण पुढील आराखडयावरून पाहू.

### गुंतवणूक जर एकदम केली तर आरजीईएसएसचा लॉक इन कालावधी




### गुंतवणूक जर हप्तेल्या केली तर आरजीईएसएसचा लॉक इन कालावधी




- **फिक्स लॉक इन कालावधी म्हणजे काय?**

संबंधित आर्थिक वर्षात पात्र सिक्युरिटीजचा पहिला सेट खरेदी केल्यानंतर 'फिक्स लॉक इन' कालावधी सुरू होतो. आणि शेवटच्या पात्र सिक्युरिटीजच्या खरेदी केल्याच्या तारखेनंतर एका वर्षाने संपतो. (त्याच आर्थिक वर्षात) या कालावधीत गुंतवणूकदाराला सिक्युरिटीज विकता येत नाहीत.

उदाहरण
तुम्ही आरजीईएसएस संलग्न डीमॅट खात्याद्वारे 25 डिसेंबर 2012 रोजी पात्र सिक्युरिटीजचा 20,000 रूपयांचा पहिला सेट खरेदी केलात आणि 31 डिसेंबर 2012 रोजी 20,000 रूपयांच्या पात्र सिक्युरिटीजचा दुसरा सेट खरेदी केलात तर दोन्ही पात्र सिक्युरिटीजच्या सेटसचा फिक्स्ड लॉक इन कालावधी 25 डिसेंबर 2012 रोजी सुरू होउन 30 डिसेंबर 2013 रोजी संपेल.

- **लॉक इन कालावधी कधीपासून सुरू होतो? खरेदीच्या तारखेपासून की डीमॅट खात्यात सिक्युरिटीज आल्यापासून?**

खरेदीच्या तारखेत आणि क्रेडीट होण्याच्या तारखेत फरक असू शकतो. संबंधित आर्थिक वर्षात डीमॅट खात्यात सिक्युरिटीज क्रेडीट झाल्याच्या तारखेपासून फिक्स्ड लॉक इन कालावधी सुरू होतो आणि पात्र सिक्युरिटीजचा शेवटचा सेट क्रेडीट झाल्या तारखेपासून एक वर्षांनंतर तो संपतो. ज्यावर योजनेअंतर्गत परतावा मागता येऊ शकतो.

- **आरजीईएसएस अंतर्गत सिक्युरिटीजच्या रिसिटच्या शेवटच्या दिवसापासून जर फिक्स्ड लॉक इन कालावधी धरण्यात येत असेल तर लॉक इन हा तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही का?**

होय. जर हप्त्यांमध्ये गुंतवणूक करण्यात आली असेल तर पहिल्या हप्त्याचा लॉक इन कालावधी हा तीन वर्षांपेक्षा अधिक असू शकतो. त्यामुळे गुंतवणूकदाराला प्रत्येक फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत 90 दिवसांपर्यंतची फ्लेक्सिबिलिटी (नो लॉक इनची) देण्यात येते. पहिल्या वर्षातील या अतिरिक्तच्या लॉक इन कालावधीत काही सिक्युरिटीजची काळजी घेता येते.

- **मी या फिक्स्ड लॉक इन कालावधीत आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजची विक्री करू शकतो काय?**

नाही. या फिक्स्ड लॉक इन कालावधीत तुम्ही या सिक्युरिटीजची विक्री करू शकत नाही.

- **फ्लेक्सिबल लॉक इन कालावधी म्हणजे काय?**

फिक्स लॉक इन कालावधी संपल्यानंतर लगेच सुरू होणा-या पुढील दोन वर्षांना फ्लेक्सिबल लॉक इन कालावधी म्हणण्यात येते.

- **या फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत मी विक्री/व्यवहार करू शकतो काय?**

या फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत तुम्ही पात्र सिक्युरिटीजचे व्यवहार (खरेदी/विक्री) करू शकता आणि आरजीईएसएस अंतर्गत करपरतावा मिळविण्यासाठी पात्र ठरू शकता. फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीतील दोन वर्षात प्रत्येकी किमान 270 दिवसांसाठी आरजीईएसएस डीमॅट खाते अस्तित्वात असायला हवे. त्यामुळे तुमच्या पोर्टफोलिओसाठी एक चतुर्थांश वर्षाचा कालावधी मिळतो.

- **फ्लेक्सिबल लॉक इन कालावधी सिक्युरिटीजचे व्हॅल्युएशन कसे केले जाते?**

फ्लेक्सिबल लॉक इन कालावधी संपल्यानंतर आरजीईएसएस पोर्टफोलिओमधून केलेली विक्री पडताळून पाहण्यासाठी व्यवहाराच्या आदल्या तारखेच्या सिक्युरिटीजचा बॅलन्स हा क्लोजिंग प्राईस म्हणून धरण्यात येईल. (व्यवहाराच्या वेळेत गुंतवणूकदाराच्या डिमॅट खात्यात त्याच्या पोर्टफोलिओचे मूल्य म्हणून ते धरले जाते. गुंतवणूकदारांनी घेतलेल्या निर्णयांना सोयीचे व्हावे यासाठी ते करण्यात येते) डिपॉझिटरीज या व्यवहारांची तारीख थेट स्टॉक एक्स्चेंजकडून मिळवितात.

पहिल्या आर्थिक वर्षातील फिक्स्ड लॉक इन कालावधीत असणा-या सिक्युरिटीजचा बॅलन्स, जरी त्या व्हॅल्यूएशनच्या दिवशी पात्र सिक्युरिटीज म्हणून गणल्या जात असल्या तरी (याचा अर्थ त्या सिक्युरिटी सीएनएक्स 100 किंवा बीएसई 100 च्या लिस्ट मधून बाहेर पडल्या असल्या तरी त्या फिक्स्ड लॉक इनचा भाग म्हणून धरल्या जातील व आरजीईएसएस पोर्टफोलिओच्या व्हॅल्यूएशनचा भाग असतील)

अ. व्हॅल्यूएशनच्या तारखेच्या दिवशी पात्र सिक्युरिटीजच्या यादीत ज्या सिक्युरिटीज असतील, फिक्स्ड लॉक इनच्या कालावधीत असलेल्या सिक्युरिटीजचा भाग नसलेल्या. त्या गुंतवणूकदार फिक्स्ड लॉक इन मध्ये घेऊ शकतो.

ब. फिक्स्ड लॉक इन कालावधीत पात्र सिक्युरिटीजवरील कॉर्पोरेट ॲक्शनद्वारे अतिरिक्त सिक्युरिटीजचे क्रेडिट बोनस/राईटसद्वारे मिळविता येते. फिक्स लॉक इनसाठी किंवा फिक्स लॉक इन कालावधीत तिला पात्र गुंतवणूक समजण्यात येईल.

- **डिपॉझिटर्स कडून एरवी व्हॅल्यूएशन करताना जे सूत्र वापरण्यात येते त्यात आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजचे व्हॅल्यूएशन करताना काही बदल करण्यात येतो काय?**

होय. आरजीईएसएस अंतर्गत करपरतावा मागण्यासाठी करायच्या सुरुवातीच्या गुंतवणूकीचे व्हॅल्यूएशन पूर्वी देण्यात आले आहे. फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत सिक्युरिटीजचे व्हॅल्यूएशन करण्याचे निकष प्र.48. मध्ये देण्यात आले आहेत. एक्स्चेंजमधील क्लोजिंग प्राईसवर डीमॅट खात्यातील सिक्युरिटीजचे व्हॅल्यूएशन डिपॉझिटर्स कडून करण्यात येते. (सीडीसीएलसाठी बीएसईतील क्लोजिंग प्राईस

घेण्यात येते तर एनएसडीएल साठी एनएसईची क्लोजिंग प्राईस घेण्यात येते). दर दिवशी मार्केट बंद झाल्यानंतर ती अद्ययावत करण्यात येते. आरजीईएसएस व्हॅल्यूएशन हे सुरुवातीच्या गुंतवणुकीच्या खरेदीच्या किंमतीवर आणि फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत आदल्या दिवसाच्या क्लोजिंग प्राईसवर करण्यात येते.इतर सिक्युरिटीजचे डिपॉझिटर्स ज्या पद्धतीने व्हॅल्यूएशन करतात त्यापेक्षा ही पदधत वेगळी आहे. मात्र, आरजीईएसएस लाभधारकांसाठी आरजीईएसएस अंतर्गत सुरूवातीच्या गुंतवणुकीचे मूल्य डिपॉझिटर्सकडून वेगळे दाखविण्यात येते. आणि त्याच्या किंवा तिच्या आरजीईएसएस पोर्टफोलिओचे मूल्य दिवसागणिक दाखविण्यात येते.

- **तीन वर्षांच्या लॉक इन अटीची अंमलबजावणी कशी करण्यात येते?**

एका वर्षाच्या फिक्स्ड लॉक इन कालावधीसह योजनेअंतर्गत एकूण लॉक इन कालावधी हा तीन वर्षांचा असतो. आरजीईएसएस अंतर्गत सिक्युरिटीज खरेदी केल्याच्या शेवटच्या दिवसापासून तो लागू होतो.

पहिल्या वर्षानंतर इक्विटीमधील लोकांची उत्सुकता अधिक वाढावी म्हणून तसेच बाजारातील धोकादायक वातावरणाचा फटका बसू नये म्हणून तसेच फायदा मिळावा यासाठी गुंतवणूकदारांना व्यवहारांची परवानगी देण्यात येते.


गुंतवणूकदाराला त्याने ज्या रकमेसाठी इन्कम टॅक्समधून सूट मागितली असेल तिच्या प्रमाणात गुंतवणूक ठेवावी लागते किंवा विक्री करण्याआधी पोर्टफोलिओचे मूल्य ठेवावे लागते.वर्षातील 270 दिवसांसाठी या पैकी जे कमी असेल ते. प्रक्रिया पुढे स्पष्ट करण्यात आली आहे.

अ. आरजीईएसएस पोर्टफोलिओला मूल्य आणण्यासाठी असे व्यवहार झाल्यास (विक्री) आरजीईएसएस खाते कम्प्लायंट मानले जाईल. विक्रीच्या दिवशी, आरजीईएसएस अंतर्गत मागण्यात आलेल्या लाभाच्या रकमेच्या पेक्षा कमी, स्टॉक्सच्या क्लोजिंग किंमतीच्या वेळी मूल्यांकन केल्यास, ट्रेडिंगच्या व्यवहाराच्या पुढच्या दिवशीची युनिटस. आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजचे मार्केट मूल्य जर लाभास पात्र मूल्यापेक्षा अधिक झाले तर अतिरिक्तच्या सिक्युरिटीज विकता येतात. पुढे जर ते मूल्य कमी झाले तरी तुम्हाला सिक्युरिटीज विकण्याची आवश्यकता भासत नाही. फक्त आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजची विक्री झाल्यासच त्याची नोंद घेण्यात येते. यामुळे मार्केटमध्ये होणा-या घसरणीपासून सुरक्षितता मिळते.

ब. फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत विक्री झाल्यास व त्याने करपरतावा ज्या रकमेवर मागायचा त्या आरजीईएसएस पोर्टफोलिओचे मूल्य कमी झाल्यास व कर परताव्यासाठीच्या रकमेपेक्षा आरजीईएसएस पोर्टफोलिओच्या समकक्ष झाल्याच्या वेळेपासून ते खाते आरजीईएसएस कम्प्लायंट होते किंवा अशा विक्रीपूर्वी आरजीईएसएस पोर्टफोलिओचे मूल्य जे कमी असेल ते. हे पुढील पैकी कोणत्याही प्रकारात घडू शकते.

- ✓ मार्केटमधील घडामोडींमुळे, आरजीईएसएससाठीचे लाभ मागावयाच्या रकमेपेक्षा आरजीईएसएस पोर्टफोलिओचे मूल्य कमी असता कामा नये. किंवा विक्रीआधी आरजीईएसएस पोर्टफोलिओची किंमत, जी कमी असेल ती.
- ✓ गुंतवणूकदार काही आरजीईएसएस कप्म्लायंट सिक्युरिटीज डिपॉझिट करतो तेव्हा, त्यामुळे अशा सिक्युरिटीज डिपॉझिट केल्यानंतर आरजीईएसएससाठीचे लाभ मागावयाच्या रकमेपेक्षा आरजीईएसएस पोर्टफोलिओचे मूल्य कमी असता कामा नये. किंवा विक्री आधी आरजीईएसएस पोर्टफोलिओची किंमत, जी कमी असेल ती.
- ✓ सिक्युरिटीज जितक्या किंमतीत विकल्या असतील त्यापेक्षा कमी किंमतीत आरजीईएसएस कम्प्लायंट सिक्युरिटीज खरेदी करण्यात येऊ नयेत.

जर खाते एकदा कम्प्लायंट झाले तर जोपर्यंत पुढील व्यवहार होउन करपरताव्याच्या रकमेपेक्षा पोर्टफोलिओची रक्कम कमी होते तोपर्यंत ते कम्प्लाईड राहते. विविध गोष्टी पुढे समजावून सांगितल्या आहेत.




गुंतवणूकदाराने पात्र सिक्युरिटीजच्या पुनर्खरेदीबाबत काळजी करायला हवी, फक्त जेव्हा गुंतवणूकदार फिक्स्ड लॉक इन अंतर्गतच्या सिक्युरिटीज विकतो (विक्रीच्या दिवशी त्या पात्र असोत किंवा नसोत) किंवा ज्या सिक्युरिटीज फिक्स्ड लॉक इन कालावधीत नाहीत पण प्र.48 मध्ये दिल्याप्रमाणे त्या गुंतवणुकीच्या व्हॅल्यूएशनसाठी धरण्यात आल्या आहेत.

**उदाहरण,** कंपनी ए मधील 400 शेअर्सच्या 50,000 हजार रुपयांपर्यंतच्या आरजीईएसएस गुंतवणुकीवर गुंतवणूकदार कर परतावा मागेल,आणि ए कंपनीचे आणखी 200 शेअर्स खरेदी करेल.(ही अतिरिक्तची खरेदी फिक्स्ड लॉक इन कालावधीत झालेली असेल किंवा फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत झालेली असेल) (अ) फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत कंपनी ए च्या 200 शेअर्सची विक्री करेपर्यंत असे समजण्यात येईल की गुंतवणूकदाराने फिक्स्ड लॉक इन मध्ये ठेवण्यात आलेले 400 शेअर्स विकले नसून अतिरिक्तचे 200 शेअर्स विकले आहेत. याचा अर्थ ते शेअर्स पुन्हा घेण्याची काळजी गुंतवणूकदाराने करू नये.( ब) जर,अशा गुंतवणूकदाराने कंपनी ए चे 300 शेअर्स विकले तर रकमेचे रिकुपिंग करण्यासाठी त्याचा ट्रक ठेवण्यात येईल (आरजीईएसएस अंतर्गत मागण्यात आलेल्या परताव्याच्या रकमेपेक्षा पोर्टफोलिओची रेसिडयुअल व्हॅल्यू कमी असेल तर) आणि कंपनी ए च्या 600 शेअर्सना विक्री आधी इन्व्हेस्टमेंट पोर्टफोलिओची व्हॅल्यू म्हणून समजण्यात येईल.

फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत पात्र सिक्युरिटीजच्या मार्केट व्हॅल्यूत कपात झाल्याने आरजीईएसएस पोर्टफोलिओत देखील कपात होईल आणि वर सांगितल्याप्रमाणे गुंतवणूकदाराने पात्र सिक्युरिटीज विकल्या तर कलम 80 सीसीजी अंतर्गत कर परतावा मागितल्याच्या रकमेइतकी इन्व्हेस्टमेंट पोर्टफोलिओची व्हॅल्यू होईल त्या दिवसापासून डिमॅट खाते कम्प्लायंट मानण्यात येईल.किंवा विक्री आधी इन्व्हेस्टमेंट पोर्टफोलिओची किंमत ती कमी असेल ते.जरी अशा विक्रीनंतर पात्र सिक्युरिटीजची खरेदी झालेली नसली तरी.

- **फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत मी पात्र सिक्युरिटीजचा व्यवहार (विक्री/खरेदी) केली नाही तर?**

अशा परिस्थितीत जर तुम्ही फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीत कोणताही व्यवहार (विक्री/खरेदी) केला नाहीत तर आरजीईएसएस अंतर्गत पोर्टफोलिओमधील गुंतवणूकीची व्हॅल्यू कितीही असली तरी तुमचे आरजीईएसएस डिमॅट खाते कम्प्लायंट राहते.

- **फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीच्या अखेरीस माझ्या डीमॅट खात्याचे काय होईल?**

फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीच्या अखेरीस तुमचे आरजीईएसएस साठीचे डीमॅट खाते हे सर्वसामान्य डीमॅट खात्यात परावर्तित होईल आणि त्यातील सिक्युरिटीज या व्यवहार करण्यास मुक्त होतील.

**देखरेख व दंड**

- **योजनेशी अनुरूप करण्यासाठी मला आरजीईएसएस पात्र सिक्युरिटीजचे मूल्य ठरवावे लागेल काय?**

नाही. डिपॉझिटरीज/ डिपॉझिटरी पार्टिसिपंटस (डीपी) यांच्याकडून आरजीईएसएस पोर्टफोलिओचे दिवसागणिक मूल्यांकन आणि 270 दिवसांसाठी योजनेशी अनुरूपता यावर लक्ष ठेवण्यात येत असते आणि डीपीकडून याबाबतची माहिती घेता येऊ शकते. तुम्ही स्वतः तुमच्या डीमॅट खात्यातील एन्ट्रीज/सिक्युरिटीजचे व्हॅल्यूएशन यांची पडताळणी करू शकता. त्यात काही विसंगती आढळल्यास तात्काळ त्याची माहिती डीपीला देण्यात यावी.

- **करपरताव्याची मागणी मी कशी करू शकतो?**

तुमच्या डीपीकडून इन्कम टॅक्स विभागाला देण्यात आलेल्या नवीन गुंतवणूकदार प्रमाणपत्र आणि खात्याचे वार्षिक स्टेटमेंट यांची प्रत तुम्हाला देण्यात येईल.

- **रिटेल इन्व्हेस्टर प्रमाणपत्र आणि खात्याचे वार्षिक स्टेटमेंट कोण देते?**

डिपॉझिटरीज आणि एक्स्चेंजेसमधून तुमच्या माहितीची शहानिशा केल्यानंतर संबंधित डीपीकडून नवीन गुंतवणूकदार प्रमाणपत्र देण्यात येईल. डीमॅट खाते उघडल्यानंतर एका महिन्यात हे प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. यासाठी कमीत कमी वेळ लागावा यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

तुम्ही तुमच्या डीपीला हे प्रमाणपत्र देण्यास सांगू शकता किंवा डिपीकडून देण्यात आलेल्या सुविधेचा लाभ घेत वेबवरून डाऊनलोड करू शकता. खात्याचे वार्षिक स्टेटमेंट देखील तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटस कडून देण्यात येईल.

- **आरजीईएसएसच्या अटींचे मी उल्लंघन केल्यास काय दंड होऊ शकतो?**

जर आरजीईएसएसच्या अटींचे उल्लंघन झाल्यास (फ्लेक्सिबल लॉक इनच्या दोन वर्षांचा देखील त्यात समावेश आहे) तर परताव्याची रक्कम ही त्या व्यक्तीच्या मिळकतीचा भाग समजण्यात येईल व ती करास पात्र ठरेल.

**उदाहरण**
आरजीईएसएसच्या दुस-या वर्षात जर गुंतवणूकदार अटींचे पालन करू शकला नाही (फ्लेक्सिबल लॉक इनचे पहिले वर्ष) तर त्याला 80 सीसीजी अंतर्गत मागण्यात आलेल्या परताव्यावर पूर्ण कर भरावा लागेल.

- **फ्लेक्सिबल लॉक इनच्या कालावधीत स्प्लिट, कन्सोलिडेशन, बोनस, राइट्स इत्यादी विविध प्रकारच्या कॉर्पोरेट ॲक्शन्सचा आरजीईएसएस पात्र गुंतवणुकीवर काय परिणाम होईल?**

स्प्लिट/ डिमर्जर यासारख्या कार्पोरेट ॲक्शनमुळे ज्यात गुंतवणूकदारासमोर कोणताही पर्याय नसतो अशाने जर आरजीईएसएस मध्ये काही बदल झाला तर बोनस इत्यादींच्या बाबतीत फ्लेक्सिबल लॉक इनच्या कालावधीत खात्याच्या कम्प्लायन्स स्टेटसवर कोणताही परिणाम होत नाही. खात्यातील आरजीईएसएस सिक्युरिटीजचा रेशो पाहून अतिरिक्त देण्यात आलेले शेअर्स आरजीईएसएस सिक्युरिटीज म्हणून धरण्यात येतील. मूळ सिक्युरिटीज प्रमाणेच या सिक्युरिटीजही लॉक इनच्या त्याच श्रेणीत (फिक्स्ड/फ्लेक्सिबल) धरल्या जातील.

फ्लेक्सिबल लॉक इनच्या कालावधीत जर कॉर्पोरेट ॲक्शन्समुळे आरजीईएसएस गुंतवणुकीत फरक पडणार असेल तर व गुंतवणूकदाराला पर्याय वापरता येत असेल व त्याची परिणती सिक्युरिटीज डेबिट होण्यात होत असेल तर त्याला विक्री व्यवहार असे समजण्यात येईल. आरजीईएसएस अंतर्गत कोणत्या कॉर्पोरेट ॲक्शन्सना संमती आहे त्याची माहिती सेबीकडून देण्यात आलेली आहे. पाहा सेबीचे कोणत्या कॉर्पोरेट ॲक्शन्स आरजीईएसएस अंतर्गत संमत आहेत त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना (http://www.sebi.gov.in/cms/sebi_data/attachdocs/1354798515651.pdf).

- **योजनेवर कशा प्रकारे देखरेख ठेवण्यात येते?**

डीमॅट खाते उघडण्यासाठी पॅन बंधनकारक करण्यात आले आहे. पॅनच्या माहितीवरूनच आरजीईएसएस देखरेख होत असते. प्रत्येक क्लायंटला ब्रोकरकडून युनिक क्लायंट कोड (यूसीसी) देण्यात येतो. तो क्लायंटच्या परमनंट अकाउंट नंबरशी (पॅन) संलग्न असतो.

डिपॉझिटरीज आणि एक्स्चेंजेसकडे असलेल्या माहितीवरून कोण नवीन गुंतवणूकदार आहे याची डिपॉझिटरीज खातरजमा करू शकतात. संबधिताने इक्विटी/डेरिव्हेटिव्हमध्ये याआधी व्यवहार केलेला नाही ना याची इतर डिपॉझिटरी आणि स्टॉक एक्स्चेंजेसमधून खातरजमा केल्यानंतरच संबधित डीपीच्याअन्वये डिपॉझिटरीज कडून नवीन रिटेल गुंतवणूकदाराचे प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. संबंधित डीपीकडून आरजीईएसएस पोर्टफोलियोचे व्हॅल्यूएशन डिपॉझिटरीज कडून देण्यात येईल आणि फ्लेक्सिबल लॉक इन कालावधीतील स्टिप्युलेटेड कंडिशनची कन्फर्मिटी देखील व्हेरिफाय करण्यात येईल. आरजीईएसएस योजनेत असणा-या पॅन होल्डर्सच्या उत्पन्नाची माहिती आयटी विभागाच्या इलेक्ट्रॉनिक डेटाबेसमधून पडताळून पहाता येउ शकते. संबंधित आर्थिक वर्षाच्या अखेरीस संबंधित डिपॉझिटरीज कडून आरजीईएसएस लाभधारकांची माहिती आयटी विभागाला देण्यात येईल.

- **पुढील अधिकच्या माहितीसाठी मी कोणाशी संपर्क साधावा?**

| | | |
|---|---|---|
| बीएसई<br>श्री योगेश बांबार्डेकर<br>डेप्युटी जनरल मॅनेजर<br>14 वा मजला, पी.जे.टॉवर्स, दलाल स्ट्रीट,<br>फोर्ट, मुंबई-400001<br>दूरध्वनीः 91 22 22728286<br>फॅक्स नंबर ऑफिस : 91 2222721338<br>ई-मेल : yogesh.bambardekar@bseindia.com | एनएसई<br>श्री युवराज पाटील<br>मॅनेजर<br>नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि.<br>एक्स्चेंज प्लाझा, प्लॉट नं.सी/1, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व)<br>मुंबई-400051<br>दूरध्वनीः 022-26598380<br>फॅक्स : 022-26598315<br>ई-मेल : ypatil@nse.co.in | सीडीसीएल<br>श्री फारोख पटेल<br>असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट<br>सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड<br>16 वा मजला, फिरोज जिजीभाय टॉवर्स,<br>दलाल स्ट्रीट, मुंबई-400001<br>दूरध्वनीः022-22723333<br>फॅक्स : 022- 22723199<br>ई-मेल : rgess@cdsindia.com |
| एनएसडीएल<br>श्री एस.गणेश<br>सिनियर व्हाईस प्रेसिडेंट<br>इन्व्हेस्टर रिलेशनशिप सेल<br>नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लि.<br>ट्रेड वर्ल्ड, ए विंग, चौथा मजला,<br>कमला मिल्स कंपाउंड,<br>सेनापती बापट मार्ग, लोअर परेल,<br>मुंबई-400 013<br>बोर्ड दूरध्वनी क्र.022 2499 4200<br>फॅक्स : 022 2497 6351<br>ई-मेल : relations@nsdl.co.in | सेबी<br>श्री बिस्वजित चौधरी, डीजीएम<br>सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया,<br>सेबी भवन, प्लॉट नं.सी 4-ए एस 'जी' ब्लॉक,<br>बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,<br>बांद्रा (पूर्व) मुंबई-400 051<br>दूरध्वनी क्र.022- 2644 9725<br>फॅक्स 022- 2644 9039/9027<br>ई-मेल : biswajitc@sebi.gov.in | अर्थ मंत्रालय<br>जॉईंट सेक्रेटरी<br>कॅपिटल मार्केट डिव्हिजन<br>अर्थ मंत्रालय<br>नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>दूरध्वनीः 2309 5246<br>फॅक्स 2309 4413<br>ई-मेल : rgess.2012@gmail.com |
| एमसीएक्स-एसएक्स<br>श्री राकेश शाह<br>वाइस प्रेसीडेंट<br>एमसीएक्स स्टॉक एक्सचेंज लि.<br>एक्सचेंज एसक्वायर, पहला माला,<br>सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व),<br>मुंबई-400093<br>फोनः91-22-6731 9000, फैक्सः91-22-6731 9004<br>ई-मेलः rakesh.shah@mcx-sx.com | | |